वृत्तपत्राचे नांव :- गांवकरी
वृत्तपत्र प्रकाशन ठिकाण :- नाशिक
वृत्तपत्र पान नं.:- 3
दिनांक :- 18/7/11
कटिंग नंबर:

# 'आयएसओ प्रमाणपत्रामुळे पौरोहित्य सेवेला जगमान्यता'

विनायक कुलकर्णी

पुणे :- पौरोहित्य सेवेला आयएसओ प्रमाणपत्र मिळाल्याने ही सेवा आता आपल्या देशापुरतीच मर्यादित न राहता आता त्याला जगन्मान्यता मिळाली आहे, असे मत पुण्यातील सुजीत देशमुख गुरुजी यांनी मुलाखत देताना व्यक्त केले.

पौरोहित्य सेवेला नुकतेच आयएसओ प्रमाणपत्र मिळाले, ही देशातील पहिलीच घटना असून हा मान पुण्यनगरीला मिळाला आहे. काही दिवसांपूर्वीच येथील गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या समारंभात देशमुख गुरुजी यांनी हे प्रमाणपत्र आचार्य किशोर व्यास यांच्या हस्ते स्वीकारले.

ऑस्ट्रियातील टीयूव्ही कंपनीच्या वतीने हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे असे सांगून ते म्हणाले, '९००१-२००८ या नवीन नियमावलीनुसार पौरोहित्य सेवेचे प्रमाणीकरण करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र मला व्यक्तिगत स्वरूपात मिळालेले नाही तर माझ्या समवेत असणारे अन्य ७-८ सहकाऱ्यांचाही यामध्ये सहभाग आहे. हे प्रमाणपत्र देण्यापूर्वी संबंधित कंपनीने आमच्या सेवेचे ऑडिटही केले होते', अशी माहिती त्यांनी दिली.

आळंदी येथील महर्षी वेदव्यास शिक्षण प्रतिष्ठान संचलित सद्गुरु निजानंद महाराज वेद विद्यालयात ७ वर्षे आणि त्यानंतर राजस्थानमधील पुष्कर येथे ब्रह्मसावित्री वेद विद्यापीठात दोन वर्षे त्यांनी शिक्षण घेतले. त्यानंतर दोन वर्षे अध्यापनाचे काम केले आणि २००३ पासून स्वतंत्रपणे व्यवसाय सुरू केला. धार्मिक कार्य संपल्यानंतर यजमानांच्या ज्या अपेक्षा आहेत त्याही एक स्वतंत्र फॉर्मवर आपण भरून घेतो. लोकांच्या नेमक्या काय अपेक्षा आहेत आणि आपण त्या कितपत प्रमाणात पूर्ण करतो अथवा नाही, याचाही आढावा घेता येतो, असे त्यांनी सांगितले.